**प्रा. राम ताकवले**
**कुलगुरू, यशवंतराव चव्हाण**
**महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**
**दि.२५-०१-१९९०**

माननीय कुलगुरू, विधिसभेचे आणि कार्यकारी मंडळाचे सदस्य, प्रतिष्ठित पाहुणे, विद्यापीठातील प्राध्यापक, सेवक, नवपदवीधर आणि बंधुभगिनींनो,

शिवाजी विद्यापीठाच्या या सव्विसाव्या दीक्षांत समारंभात मला आपण दीक्षांत भाषण देण्यास निमंत्रित केले हा मी माझा मोठा बहुमान समजतो. आणि त्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो.

या विद्यापीठाचा विकास आणि प्रगती मी अगदी जवळून पाहिली आहे. १९६३ साली या सागरमाळावरील पाणलोट, खेळाच्या मैदानाच्या बाजूने जावा म्हणून एक चर श्रमदानाने खणण्यात येत होती. येथील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या बरोबरीने मीही त्या कामात सहभागी झालो होतो. हे विद्यापीठ वर्षभरातच या सागरमाळावर उभे राहिलेले मी पाहिले आहे. महाराष्ट्रातील जुन्या विद्यापीठांत ज्या सोयी-सुविधा निर्माण करण्यास १५-२० वर्षे लागली, त्या ५-७ वर्षातच उभ्या करण्याचे कर्तृत्व विद्यापीठाने दाखवले आहे. आज ह्या विद्यापीठात १५५ महाविद्यालये, १९ विद्यापीठ-विभाग आणि सुमारे १ लक्ष विद्यार्थी असून, सोलापूरला विद्यापीठाचे उपकेंद्रही निर्माण झाले आहे. या विद्यापीठाने स्थापनेपासूनच आपल्या प्रशासकीय आणि शैक्षणिक कार्यक्षमतेने सर्वांना प्रभावित केलेले आहे. डॉ.आप्पासाहेब पवारांनी दूरदृष्टीने, अथक परिश्रमाने आणि प्रशासकीय व शैक्षणिक नेतृत्वाने निर्माण केलेले हे विद्यापीठ आज सर्व क्षेत्रांत चांगली प्रगती करीत आहे. आज डॉ.प्रतापराव पवार यांच्या नेतृत्वाखाली त्यास प्रगतीच्या व विकासाच्या विविध दिशा लाभत आहेत. या प्रगतीबद्दल मी या विद्यापीठाचे कुलगुरू, प्राध्यापक, विद्यार्थी व सेवक या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. आणि त्यांच्या ज्ञानार्जनाच्या आणि ज्ञानदानाच्या कार्यात अधिकाधिक यश लाभो, अशी प्रार्थना करतो.

शिवाजी विद्यापीठ ही दक्षिण महाराष्ट्राची ऐतिहासिक गरज होती. कोल्हापूरच्या परिसराने महाराष्ट्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. महाराणी ताराबाई यांनी पुण्याच्या वर्चस्वाला आव्हान देऊन स्वतंत्र राज्याची येथे स्थापना केली. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी सांस्कृतिक समतेच्या लढ्यात नेतृत्व केले आणि मोफत शिक्षणाच्या सुविधा सर्वांसाठी उपलब्ध करून दिल्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामीण महाराष्ट्राच्या अभ्युदयासाठी सहकारी चळवळीची उभारणी याच भागात

मोठ्या प्रमाणात झाली. आणि सहकारातून समृद्धीची, विकासाची वाट महाराष्ट्राला दाखविली. महाराष्ट्राचे राजकीय नेतृत्व दक्षिण महाराष्ट्राने केले. मा.यशवंतराव चव्हाण आणि मा.वसंतदादा पाटील यांच्यासारखे द्रष्टे आणि लोकनेते महाराष्ट्राला व देशाला दिले. करवीरभूमी व परिसर स्वाभिमानाची, धगधगत्या सामाजिक चळवळीची आणि कर्तृत्ववान पुरूषांची भूमी आहे. अशी थोर ऐतिहासिक, सामाजिक व सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या भूमीत शिवाजी विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. त्यामुळेच शिवाजी विद्यापीठातून समाजाच्या व महाराष्ट्राच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत. त्याच विद्यापीठास सतत प्रेरणा देत राहतील, असा मला विश्वास आहे.

प्रमुख पाहुण्यांकडून दीक्षांत भाषणांत दोन अपेक्षा केल्या जातात. पहिली, त्याने एखाद्या विषयावर अभ्यासपूर्ण विवेचन करावे व दुसरी अपेक्षा, नवीन पदवीधरांना जीवनात पर्दापण करताना यथोचित उपदेश करावा. या अपेक्षा पूर्ण करण्याचा मी यथाशक्ती प्रयत्न करणार आहे.

कोणतेही विद्यापीठ स्थापन करण्यात येते त्यावेळी त्या विभागाच्या, शिक्षणाच्या आणि विकासाच्या गरज ते विद्यापीठ भागवील, विश्वात्मक ज्ञान विविध अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना देण्याच्या सुविधा अधिक चांगल्या रीतीने निर्माण होतील, विद्यापीठाच्या कार्यक्रमातून शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगती साधली जाईल आणि ही प्रगती अंतिमत: सामाजिक व आर्थिक प्रगतीस प्रेरक ठरेल अशी अपेक्षा असते. परंतु, अशा प्रकारची प्रगती घडताना दिसते काय? सर्वांना ती व्यवहारात प्रत्ययास येते काय?

महाविद्यालये आणि विद्यापीठ–विभाग सुरू करून त्यांद्वारा शिक्षण देण्याची जी विद्यापीठीय पद्धती आज विकसित झाली आहे, तिचे स्वरूप व मर्यादा समजून घेणे आवश्यक आहे असे मला वाटते.

आधुनिक भारतातील उच्च शिक्षणपद्धती ब्रिटीश राज्याच्या काळात निर्माण झाली. त्या अगोदरची भारतीय शिक्षणपद्धती काळाच्या उदरात गडप झाली. प्रथम स्थापन करण्यात आलेली विद्यापीठे म्हणजे मुंबई, मद्रास, व कलकत्ता विद्यापीठे ही इंग्लंडमधील लंडन विद्यापीठाच्या रचनेवर आधारित होती. त्यावेळी लंडन विद्यापीठ हे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची परीक्षा घेणारे एक बोर्ड होते. तसेच कार्य भारतातील विद्यापीठांनी आरंभिले आणि महाविद्यालयांना संलग्न करून घेऊन त्यांनी शिकवलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे हे महत्त्वाचे कार्य विद्यापीठांचे झाले. भारतातील विद्यापीठांत आज हेच महत्त्वाचे कार्य झाले आहे. परिणामत: विद्यार्थी परीक्षार्थी झाला आहे, शिक्षकही परीक्षार्थी झाला आहे. परीक्षा पास होण्याचे तंत्र आणि मंत्र शिकवणारे अनेक खाजगी क्लासेस् मोठ्या प्रमाणात चालू आहेत. सर्व विद्यापीठीय कामकाज परीक्षांच्या चौकटीत अडकून पडल्यासारखे झाले आहे.

भारतात सुरू झालेली संलग्न महाविद्यालयीन शिक्षणपद्धती इंग्लंडच्या विद्यापीठात राहिली काय? हिंदुस्थानातील पहिली विद्यापीठे स्थापन झाल्यानंतर काही वर्षातच इंग्लंडमधील विद्यापीठांचे स्वरूप बदलले. आज तेथील महाविद्यालयांची व विद्यापीठांची शिक्षणपद्धती खूपच बदलली आहे. इथे असलेली संलग्न विद्यापीठ पद्धती पाकिस्तान, बांगला देश सोडून जगात आज कोठेही नाही.

ब्रिटीशांच्या काळात सुरू झालेली विद्यापीठीय पद्धतीची उद्दिष्टे अत्यंत मर्यादित होती. ब्रिटिश प्रशासनास आवश्यक असणारा सेवकवर्ग यातून निर्माण व्हावा हा त्या शिक्षणपद्धतीचा प्रमुख उद्देश होता. सत्ता–सामर्थ्यांच्या जोरावर युरोपातील संस्कृती जगात सामर्थ्यवान ठरली होती. समर्थांची संस्कृती शिक्षणाद्वारे शिकवण्याचे विद्यापीठ हे एक साधन होते. त्याचमुळे महाविद्यालयीन शिक्षणात्त सर्वसाधारण विषयांचे म्हणजेच बी.ए.च्या पदवी अभ्यासक्रमांचे प्राबल्य होते. व्यावसायिक अभ्यासक्रमात वाहिलेली महाविद्यालये काढणे कटाक्षाने टाळण्यात आले. विज्ञान व तंत्रज्ञानाचा उगम व वाढ युरोपात गेल्या तीन–चार शतकांत मोठ्या प्रमाणांत झाली. परंतु, हिंदुस्थानात काही अपवादात्मक महाविद्यालये किंवा संस्था सोडता बहुतेक सर्वांनी सर्वसाधारण अभ्यासक्रम शिकवण्याचेच कार्य केले. शिवाय अशा प्रकारचे अभ्यासक्रम तयार करणे, शिकवणे, परीक्षा घेणे हे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या शिक्षणापेक्षा कमी खर्चाचे व सोयीचे असते. ब्रिटीशांच्या या धोरणामुळे फार प्रचंड असमतोल आजच्या शिक्षणात निर्माण झाला आहे.

जीवन जगण्यास, आयुष्यात कोणते व कशा प्रकारचे ज्ञान व कौशल्ये लागतात याचा विचार केला तर असे आढळून येईल की, ७०–८० टक्के परिस्थितीत या ना त्या कौशल्यांची गरज लागते. याचाच अर्थ असा की, एकूण विद्यार्थ्यांपैकी ८० टक्के विद्यार्थ्यांना विविध जीवनोपयोगी कौशल्यांचे ज्ञान देणे आवश्यक आहे. प्रत्यक्षात काय दिसते? आज भारतात सुमारे ४० लक्ष विद्यार्थी शिकत आहेत. त्यापैकी ३० लक्ष विद्यार्थी बी.ए., बी.कॉम. व बी.एस्सी सारख्या सर्वसाधारण पदवीचा अभ्यास करतात. एकूण पदवी अभ्यासक्रमात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येपैकी सुमारे ७५ ते ८० टक्के सर्वसाधारण पदवी घेतात. इतर २० ते २५ टक्के व्यावसायिक पदवी घेतात. चीनसारख्या देशात याच्या उलट परिस्थिती आहे. तेथे १५ टक्के विद्यार्थी सर्वसाधारण अभ्यासक्रम शिकतात, तर बहुसंख्य विद्यार्थी व्यावसायिक पदव्या घेतात.

सर्वसाधारण अभ्यासक्रम पूर्ण करून जीवनात पदार्पण करणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीचा फार मोठा प्रश्न निर्माण होतो. त्यांना नोकरीसाठी वणवण हिंडावे लागते. प्रशासनातील कनिष्ठ नोकऱ्यांशिवाय इतर उद्योग व्यवसायांत अशा पदवीधरांचा फारसा उपयोग होत नाही. फार काय, नोकरी करण्यासाठी लागणारी आवश्यक कौशल्ये व दृष्टिकोन हाही आपल्या शिक्षणाचा भाग नसल्यामुळे नोकरीच्या ठिकाणी बऱ्याच गोष्टी सुरूवातीपासूनच शिकाव्या लागतात. अनेकांना टंकलेखन, लघुलेखन

अशी कौशल्ये खाजगी व्यवसाय शिक्षण देणाऱ्या संस्थांकडून शिकावी लागतात. विद्यार्थ्यांच्या गरजा व शिक्षण यांचे नातेच तुटल्यासारखे झाले आहे.

याचा अर्थ असा नव्हे की, सध्याच्या शिक्षणाने काहीच साधले नाही. भारताच्या जडणघडणीत विद्यापीठांतून शिकून तयार झालेल्या अनेक पदवीधर तरूणांनीच देशाचे नेतृत्व सर्व क्षेत्रात केले आहे. आधुनिक भारताच्या जडणघडणीत त्यांचा वाटा मोठा आहे. भारतातील सामाजिक व सांस्कृतिक चळवळीतही या शिक्षित युवकांचा फार मोठा वाटा आहे. यांच्यातूनच प्रो.सी.व्ही.रमण, डॉ.होमी भाभा, डॉ.मेघनाद सहा, प्रो.बोस ह्यांसारखे जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ निर्माण झाले आहेत. डॉ.विश्वेश्वरय्यांच्यासारखे इंजिनिअर तयार झाले आहेत. आधुनिक भारतातील सुशिक्षित मध्यमवर्ग निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य हया विद्यापीठीय शिक्षणपद्धतीने केले आहे. असे मोठे यश जर या शिक्षणाने दिले, तर मग या शिक्षणपद्धतीवर टीका का, असा प्रश्न साहजिकच उपस्थित केला जाईल.

ज्यावेळी कोणत्याही पद्धतीचा आपण विचार करतो, त्यावेळी त्यातील बहुसंख्यांकांचा आपण विचार करीत असतो, शिक्षरावर पोहोचलेल्या काही थोड्या व्यक्तींचा नव्हे, त्या अपवादात्मक असतात. त्यांनी जे यश मिळवलेले असते, त्यात त्या व्यवस्थेचा वाटा थोडा असतो. त्यांचे यश त्यांच्या व्यक्तिगत प्रयत्नांतून, बुद्धिमत्तेतून व त्यांना सहाय्यभूत ठरवलेल्या कौटुंबिक जीवनातून मिळालेले असते. एकूण शिक्षणपद्धतीचा प्रभाव कमी असतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर शिक्षणक्षेत्रात प्रचंड वाढ झाली आहे. अनेक महाविद्यालये, विद्यापीठे स्थापन झाली. आज देशात ६००० महाविद्यालये, १५० हून अधिक विद्यापीठे व तत्सम संस्था आहेत. ४० लक्ष विद्यार्थी शिक्षण घेत आहेत व त्यांना शिकवणाऱ्या प्राध्यापकांची संख्या अडीच लक्ष आहे. गेल्या ३० वर्षात विद्यार्थ्यांच्या संख्येत तिपटीहून अधिक वाढ झाली आहे.

शिक्षणाची संख्यात्मक वाढ झाली तरी ती पुरेशी विस्तृत आहे का? १७ ते २२ वयोगटातील युवकांची संख्या घेतल्यास त्यातील फक्त ५ टक्के विद्यार्थीच उच्च शिक्षण घेताना दिसतील. याचा अर्थ ९५ टक्के विद्यार्थ्यांना हे शिक्षण दुर्लभ आहे. तसेच त्यावरील दरडोई खर्चही खूपच आहे. सर्वसाधारणतः प्रथम पदवीसाठी दरडोई दरवर्षी दोन हजार रूपयांपेक्षा जास्त अनावर्ती खर्च आहे. अभियांत्रिकी आणि वैद्यकशास्त्रातील पदवीला खाजगी महाविद्यालयात किती फी द्यावी लागते, यावरून प्रत्येकाच्या शिक्षणावर किती खर्च समाज किंवा शासन करते याची कल्पना येईल.

विकसित देशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या आपल्यासारखी ५ टक्के नसून सुमारे १५-२० टक्के असते. ही संख्या त्या देशाच्या विकासाच्या गरजा पुरवण्यासाठी आहे. आपला देशाही जसजसा विकसित होईल, तसतशी पदवीधरांची जास्त गरज लागणार आहे. परंतु, ही गरज सर्वसाधारण पदवीधरांची नव्हे, तर व्यावसायिक कौशल्ये व ज्ञान मिळवलेल्या पदवीधरांची.

विद्यापीठीय शिक्षणापासून समाजाच्या फार मोठ्या अपेक्षा आहेत. पदवी हे जसे नोकरीचे साधन मानले जात आहे किंवा असावे ही अपेक्षा आहे, तसेच पदवी ही सामाजिक प्रतिष्ठेचा भागही बनली आहे. ज्ञानाला आपल्या समाजात जी मान्यता व श्रेष्ठत्व दिले आहे त्याचाच हा परिणाम. त्यामुळे पदवी प्राप्त करू इच्छिणाऱ्यांची संख्या वाढली. पूर्वीच्या शिक्षण पद्धतीचा फायदा काही मूठभर लोकांना मिळत होता. म्हणूनच ते वर्गीय शिक्षण (क्लास एज्युकेशन) होते. आता ते लोक शिक्षण (मास एज्युकेशन) झाले आहे. परंतु, हा बदल संख्येत झाला. शिक्षणपद्धती मात्र तीच राहिली, हीच खरी शोकांतिका आहे.

संख्यात्मक वाढीचे प्रचंड आव्हान अमेरिकेच्या शिक्षणपद्धतीपुढे आले होते. दुसऱ्या महायुद्धासाठी १७ वर्षावरील सर्व युवकांना युद्धात सामील व्हावे लागले. लष्करी सेवेत गेल्यानंतर लक्षावधी युवक युद्धसमाप्तीनंतर घरी परतले. त्यांना समाजात पुनर्स्थापित करावयाचे होते. त्यांना समाजजीवनात योग्य ते स्थान मिळावे, व्यवसाय लाभावा म्हणून शिक्षणाची संधी त्यांना द्यावी असा प्रस्ताव महाविद्यालयांपुढे आणि विद्यापीठांपुढे मांडला. त्यांना शासनाने शिष्यवृत्त्या दिल्या. शिक्षण अर्धवट सोडलेल्या, हायस्कूलचे शिक्षण पूर्ण न केलेल्या, तसेच शिक्षणामध्ये बराच खंड पडलेल्या लक्षावधी सैनिकांसाठी शिक्षणाची सोय करावयाची होती.

हे शिक्षणाचे आव्हान अमेरिकेच्या शिक्षणपद्धतीने पेलले. नवनवीन व्यावसायिक अभ्यासक्रम निर्माण केले, कम्युनिटी कॉलेजेस्–समाज महाविद्यालये निर्माण केली व त्यांमधून नेहमीच्या शिक्षणाबरोबरच व्यवसायांशी व जीवनातील गरजांशी संबंधित शैक्षणिक अभ्यासक्रम निर्माण केले, यशस्वीरित्या शिकवले. त्यातूनच अमेरिकेच्या शिक्षणपद्धतीत वास्तववादी दृष्टिकोन, लवचिकता आणि संबद्धता निर्माण झाली.

राष्ट्रीय प्रश्न पेलण्याचे आणि ते यशस्वीरित्या सोडवण्याचे सामर्थ्य अमेरिकेच्या शिक्षणपद्धतीत होते व आहे. तसेच सामर्थ्य आमच्यात आहे का? नसल्यास ते का नाही? ते आणता येईल काय? त्यासाठी काय करावे लागेल असे अनेक प्रश्न उपस्थित होतात.

या अनेक प्रश्नांचा उहापोह अनेक चर्चासत्रांतून, अहवालांतून व शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात करण्यात आला आहे. त्या सर्वांचा निष्कर्ष एकच आहे. विविध प्रकारची आव्हाने पेलण्यासाठी आवश्यक ती लवचिकता, स्वायत्तता व प्रयोगशीलता आमच्यात फार कमी आहे. आमचे शिक्षण साचेबंद आहे. तो साचा इंग्रजी राजवटीपासून तसाच आहे. गेल्या २५–३० वर्षांत सुधारणा करण्याचे जे अनेक प्रयोग झाले, ते प्रयोगच राहिले. संपूर्ण शिक्षणपद्धती बदलण्यासाठी परिणामकारक मार्ग फारसे सापडले नाहीत. ही सर्वांचीच खंत आहे.

याचा अर्थ असा नव्हे की, निराश व्हावे आणि काहीच होणार नाही म्हणून स्वस्थ बसावे.

अनेक प्रयोगांतून जे मार्गदर्शन आजवर झाले त्यांचे धोरणांत रूपांतर झाले आहे. ही धोरणे खरोखरी चांगल्या प्रकारे अंमलात आणली तर शिक्षणसंस्था समाजोच व भावी पिढ्यांचे प्रश्न सोडवण्यास समर्थ ठरतील असा विश्वास आहे.

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये बदलाची अनेक सूत्रे आहेत. अभ्यासक्रमांची पुनर्रचना करणे, त्यांचे व्यावसायिकरण करणे, विद्यापीठ–विभागांना आणि महाविद्यालयांना स्वायत्तता देणे, ग्रामीण महाविद्यालये व विद्यापीठे स्थापणे, व्याख्यांत्यांच्या नोकरीसाठी आणि उच्च अभ्यासक्रमांसाठी पात्रता परीक्षा ठेवणे, प्राध्यापकांचे सतत प्रशिक्षण करणे, संशोधनाचा व शिक्षणाचा त्या भागाच्या विकासाशी संबंध जोडणे आणि मुक्त व दूर शिक्षणपद्धतीतून सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे ही ती प्रमुख सूत्रे होत. यापैकी काही योजना अमलात येण्याच्या मार्गावर आहेत. काहींच्या बाबतीत निर्णय झाले आहेत, अंमलबजावणी व्हायची आहे.

पुढारलेले देश पुढारलेले का राहातात व मागासलेले देश लवकर का पुढे येत नाहीत हा प्रश्न अनेक वेळा पडतो. त्याचे उत्तर अगदी साधे आहे. सर्वांगीण विचारमंथनातून योग्य योजना निर्माण केली व ती अंमलात चटकन येऊ शकली तर तो देश प्रगतीपथावर राहतो. ज्यावेळी धोरणे व कार्यक्रम राबवण्यात वर्षानुवर्षे जातात, फार काय दशके लागतात, कित्येकदा ते कार्यक्रम बासनात बांधून ठेवले जातात, त्यावेळी देश मागासलेले राहतात. आमच्या देशात अलौकिक बुद्धिमत्ता आहे, कल्पना आणि योजना मांडण्याचे मोठे सामर्थ्य आहे. परंतु, चिकाटीने आणि नेटाने त्या अंमलात आणण्याची क्षमता नाही. त्यामुळेच आपण मागे पडतो आहोत.

या सर्व परिस्थितीमागचे कारण उघड आहे. १५० वर्षाच्या गुलामगिरीतून आणि शेकडो वर्षांच्या परंपरांमधून अजून समाजमन बाहेर पडलेले नाही. बदलास मोकळ्या मनाने सामोरे जावे, परिस्थिती बदलण्यासाठी संघर्ष आणि श्रम करण्यासाठी सतत तयारी ठेवावी आणि नवी परिस्थिती व नवे प्रश्न समर्थपणे पेलावेत असे नव्या युगाचे शिक्षणच आम्हाला मिळत नाही. चाकोरी मोडू नये म्हणून सर्वांचा दबाव, आग्रह, अशा वृत्तीतून उज्ज्वल आणि प्रगतिशील भारत घडवणारा युवक कसा तयार होणार? म्हणूनच बदलासाठी, बदल मुक्त मनाने स्वीकारण्यासाठी, नवे शिक्षण देण्याची आजची गरज आहे.

परिवर्तनशील समाजासाठी शिक्षण ही आजच्या काळाची गरज आहे. 'काळाची गरज' हे वापरून गुळगुळीत झालेले शब्द मी वापरतो आहे याची मला जाणीव आहे. परंतु, गेल्या १५–२० वर्षांत जे बदल भारतीय जीवनात झाले आहेत ते पाहिल्यास आजच्या बदलत्या समाजाचा संदर्भ आपल्या लक्षात येईल. संज्ञापन (कम्युनिकेशन) क्षेत्रात क्रांती होत आहे. सूक्ष्म इलेक्ट्रॉनिक्स,

उपग्रह, संगणक, टी.व्ही., व्ही.सी.आर., इत्यादी नवनवीन साहित्य आज नवतंत्रज्ञान उपलब्ध करून देत आहे. त्यामुळे तुमच्या–आमच्या दैनंदिन जीवनात, करमणुकीच्या क्षेत्रात, रोजगार–व्यवसायात, काम करण्याच्या पद्धतीत, फार काय जीवनाच्या सर्वच क्षेत्रात फार मोठे बदल घडून येत आहेत. हे बदल एवढे प्रचंड आहेत की, अमेरिकेसारख्या पुढारलेल्या देशात कामगारास किंवा व्यावसायिकास आयुष्यात दोन–तीनदा काम अथवा नोकरी बदलावी लागते, नवीन कौशल्ये आत्मसात करावी लागतात. आपल्याकडेही हे बदल येऊ घातले आहेत. एकदा पदवी अभ्यासक्रमासाठी शिकले की, आयुष्यभर ती शिदोरी पुरवण्याचे दिवस गेले. आता सतत शिकावे लागणार आहे. शिक्षणाचा उद्देश व पद्धतीही आता बदलावी लागणार आहे. काय शिकावे यापेक्षा कसे शिकावे हेच शिकणे महत्त्वाचे आहे.

येऊ घातलेलया बदलाचा वेग आणि व्याप्ती फार प्रचंड आहे. गेल्या १०० वर्षांत जे बदल घडले तेवढे किंबहुना त्याहून अधिक येत्या १५–२० वर्षांत होणार आहेत. या बदलांना आजच्या पदवीधरांना सामोरे जावे लागणार आहे. त्यांचा वापर स्वतःच्या, कुटुंबाच्या व देशाच्या विकासासाठी करून घ्यावा लागणार आहे.

समाजात ज्यावेळी प्रचंड स्थित्यंतरे होतात, त्यावेळी सर्व समाज ढवळून निघतो. सर्वांच्यावर त्याचा परिणाम होतो, हे बदल क्रांतिकारक स्वरूपाचे असतात. अशा क्रांतीच्या युगातून आपण जात आहोत. त्यामुळे या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगात शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व येणार आहे. शिक्षण ही प्रत्येकाची गरज होणार आहे. या संदर्भात इंग्लंडच्या मुक्त विद्यापीठाच्या अहवालात म्हटले आहे, "It is... unjust to the individual and unnwise for the society to deny the greatest educational oppoirtunity to the greaest number of its citizens. For long regarded as the privilege of a few, the opportunity to engage in higher edcuation is at last becoming widely accepted as a basic individual right. Moreover, edcuation in general, and higher edcuation in particular is, at one and the same time, a necessary condition of a modern technological society and defence against its abuse."

वरील विधानात दोन–तीन महत्त्वाच्या संकल्पना मांडल्या आहेत.एक, उच्च शिक्षण हे ज्यांना ज्यांना शिकण्याची इच्छा आहे, त्यांना उपलब्ध करून दिले पाहिजे. तो व्यक्तीचा अधिकार आहे व प्रगत समाजासाठी तो पुरवला पाहिजे. दुसरी, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित समाजासाठी उच्च शिक्षण आवश्यक आहे. आणि तिसरी नवीन तंत्रज्ञानाचा दुरूपयोग केला गेल्यास त्यापासून संरक्षण मिळण्यासाठी हे शिक्षण आवश्यक आहे.

शिक्षणातील उच्च–कनिष्ठता ही वाढत्या वयोबरोबर वाढते शिक्षण देण्यासाठी ठरलेल्या

टप्प्यांवर अवलंबून आहे. त्यातूनच प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन व विद्यापीठांच्या स्तरांचा अथवा पातळ्यांचा उगम झाला. त्याचा संदर्भ विद्यार्थ्यांच्या वयाबरोबरच आहे, तसेच बौद्धिक व कौशल्यांच्या विकासाबरोबरही आहे.

परंतु, व्यवहारात आणि उपयोजित क्षेत्रात मात्र अशा पातळ्या पाडणे कठीण जाते. शेती करताना, पीक काढताना त्यासंदर्भातील सर्व आधुनिक ज्ञान अथवा कौशल्य आवश्यक असते. नसल्यास उत्पन्न कमी होणार व तोटा होणार. विक्री करणाऱ्या विक्रेत्यास ती कला आली पाहिजे. त्यात उच्च, कनिष्ठ काही नाही. त्यास त्या परिस्थितीत आवश्यक ते सर्व ज्ञान व कौशल्य असलेच पाहिजे. याहून निराळ्या परिस्थितीत कदाचित अधिक ज्ञानाची अथवा कौशल्याची गरज लागेल आणि व्यवहारातील अनुभव असा की, गरज असली की माणूस ज्ञान व कौशल्य संपादन करतो व त्यात श्रेष्ठत्वही मिळवतो. काही शेतकऱ्यांनी प्रयोग करीत 'प्रयोग परिवार' स्थापन करून द्राक्ष पीक वाढवण्याचे शास्त्रीय ज्ञान व कौशल्य आत्मसात केले. एवढेच नव्हे, तर प्रयोग करून तास चमन, सोनाका आदी द्राक्षांच्या नवीन जाती निर्माण केल्या. नवीन पद्धतींनी कमी काळात अधिक पिके कशी काढावीत, याचे तंत्रज्ञान विकसित केले. हे संशोधन नाही काय? प्रत्यक्ष प्रश्न सोडवताना संशोधकाची दृष्टी असेल, ज्ञान व विविध कौशल्ये असतील, तर ते प्रश्न शास्त्रीय पद्धतीने सोडवता येतात. परिस्थितीवर मात करता येते व आपला विकास साधता येतो. अशाप्रकारे व्यवहारात अशिक्षित किंवा कमी शिक्षित माणसे खूप यशस्वी झालेली दिसतात कै.वसंतदादा पाटील यांच्यासारखा माणूस उच्च शिक्षण नसताना समाजाला व राज्याला मार्गदर्शक ठरतो. याचे कारण समाजजीवन हे एक फार मोठे विद्यापीठ आहे. तेथे धडपडणे, विविध प्रश्न समजावून घेणे व ते सोडवणे हेही शिक्षणाचे व विकासाचे खरे कार्य आहे. खरे तर आमचे उच्च शिक्षण अशाच प्रकारचे असायला हवे. समाजाचे प्रश्न सोडवताना, काम करताना ते घेता आले पाहिजे. ज्ञानक्षेत्र व कृतिक्षेत्र एकच असायला पाहिजे, तरच शिक्षणातला पुस्तकीपणा जाईल.

खरे तर अभ्यासक्रमाची पुर्नरचना करणे, त्यांचे व्यावसायिकरण करणे व उपयुक्तता वाढवणे या शैक्षणिक सुधारणेच्या कार्यक्रमांत हेच अपेक्षित आहे. शिक्षणाचा विकासाशी संबंध जोडला पाहिजे हे आग्रहाने कोठारी आयोगाच्या अहवालात १९६६ सालीच मांडले होते. आजही २४ वर्षानंतर त्यात आपण फारशी प्रगती केली नाही. संगमनेर महाविद्यालयासारखी काही अपवादात्मक महाविद्यालये, महाविद्यालयांचा समाजाच्या विकासाशी सांधा जोडण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांनाही प्रचलित शिक्षणपद्धती फारसे सहकार्य देत नाही. फार काय, ह्या सुधारणा पराभूत कशा होतील हेच कळत–नकळत प्रचलित पद्धतीतून होत असते.

यावर फक्त टिका करून चालणार नाही. उपाय सुचवला पाहिजे व तो आचरणात आणला

पाहिजे. यावरील उपाय खरे तर १५ वर्षापूर्वीच सांगितला आहे. आज सर्वांचे पाय एकमेकांना बांधलेले असतात. चालायचे तर सर्वांनी एकत्र नाहीतर चालणेच नको, अशी परिस्थिती सर्व महाविद्यालयांची आहे. अशा परिस्थितीत सर्वांत हळू चालणाऱ्यांच्या वेगाने सर्व शिक्षणप्रणली हलत असते. हे अयोग्य आहे. देशाच्या, समाजाच्या हिताच्या विरूद्ध आहे. म्हणूनच महाविद्यालयांना स्वायत्तता देऊन समाजास व विद्यार्थ्यांस उपयुक्त शिक्षण देण्याच्या विविध पद्धती विकसित करण्याचे स्वातंत्र्य देणे आवश्यक आहे. हा स्वायत्ततेचा प्रश्न गेल्या १५ वर्षात आम्ही सोडवू शकलो नाही. आमचा स्वत:वरील अविश्वास, स्वातंत्र्याबरोबर येणारी जबाबदारी पेलण्याची असमर्थता आणि एकूणच सुरक्षित परिस्थितीतून नवीन परिस्थितीत धैर्याने पाऊल टाकण्यासाठी लागणाऱ्या मानसिकतेचा अभाव ही त्याची कारणे आहेत. यामध्ये आशेचा किरण हाच ही काही महाविद्यालये, काही प्राचार्य व प्राध्यापक अशा बदलासाठी वाटेल ते कष्ट करण्यास तयार असतात. परिवर्तनशील व्यक्ती थोड्याच असतात. पण त्यांना मुक्त वाव दिल्यानेच समाजास नवीन दिशा आणि विकासाचे कार्यक्रम लाभतात. म्हणूनच ज्यांची ज्यांची तयारी आहे, अशांना स्वायत्तता देऊन आजची शिक्षणपद्धती भारतीय शिक्षणपद्धतीत रूपांतरीत करणे आवश्यक आहे. आमच्या ज्ञानाच्या, कौशल्याच्या व विकासाच्या गरजा पुरवणारी शिक्षणपद्धती विकसित करणे हे आपल्या सर्वांचे परम कर्तव्य आहे.

स्वायत्त महाविद्यालयांना अनेकांचा विरोध आहे. विशेषत: काही प्राध्यापकांचा, मला येथे आवर्जून सांगावेसे वाटते की, आजवर समाजाने व देशाने प्राध्यापकांच्या प्रश्नांकडे सहानुभूतीने पाहिले आहे. अलीकडील वेतन सुधारणा अंमलात येत आहेत. आता आपली जबाबदारी योग्य शिक्षणपद्धती निर्माण करण्याची आहे. ही जबाबदारी पार पाडण्यात आम्ही अयशस्वी ठरलो, तर तशाच सहानुभूतीची समाजाकडून अपेक्षा करता येणार नाही. नव्हे, समाजाच्या रोषास आपण पात्र होऊ. म्हणूनच देशात शैक्षणिक परिवर्तनाच्या ज्या चळवळी आहेत, कार्यक्रम आहेत ते चांगल्या तऱ्हेने राबवणे, विकसित करणे हे आपले कर्तव्य आहे. ते प्रयत्नपूर्वक आपण यशस्वी केले पाहिजे.

नवीन शैक्षणिक धोरणातील एक महत्त्वाची सुधारणा म्हणजे अनौपचारिक शिक्षणाचा मार्ग जनतेला उपलब्ध करून देण्याची महाराष्ट्रात ना.यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने मुक्त विद्यापीठ स्थापन करून या कार्यास सुरूवात झाली आहे. या विद्यापीठाची उभारणी करण्याचे कार्य करण्याचा बहुमान मला मिळाला हे मी माझे भाग्य समजतो.

संज्ञापनक्षेत्रात आज जी क्रांती होत आहे, त्याचेच फलित म्हणजे मुक्त विद्यापीठ. मुक्त विद्यापीठातील दूर शिक्षण पद्धतीला हेन्री देझूदे (Henri dieuzeide) या शिक्षणतज्ज्ञाने शिक्षणक्षेत्रातील कोपर्निकसची क्रांती असे म्हटलेले आहे. शिक्षण हे शिक्षककेंद्री न राहता विद्यार्थीकेंद्री

झाले पाहिजे. या विद्यापीठांतर्फे विद्यार्थ्यांना, प्रौढांना, काम करणाऱ्यांना, आपल्या कामात खंड न आणता घरबसल्या शिक्षणाची संधी लाभणार आहे. विद्यार्थी गटांच्या गरजा जाणून घेऊन त्यावर आधारित अभ्यासक्रम तयार करणे, देशातील ज्येष्ठ, श्रेष्ठ आणि अनुभवी प्राध्यापकांच्या आणि तज्ञांच्या मदतीने अभ्यासपुस्तके तयार करणे, दृक्श्राव्य माध्यमांचा वापर करून ध्वनीफिती आणि चित्रफिती तयार करणे आणि हे सर्व साहितय विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे, हे या विद्यापीठाचे कार्य आहे. विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनास उपयुक्त असे हे साहित्य असणार आहे. मार्गदर्शनासाठी तज्ज्ञांची सोय महाराष्ट्रातील विविध ठिकाणी करण्यात येत आहे. बी.ए., बी.कॉम.. इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर विज्ञान, शेती इत्यादी अनेक क्षेत्रांतील अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्याची योजना आहे. काम करता शिकता यावे, अनुभवातून व कृतिशील अध्ययन असावे हा सततचा प्रयत्न राहील.

येत्या १० वर्षांत देशांतील महाविद्यालयांमध्ये १० लक्ष विद्यार्थ्यांची भर पडणार आहे. यातील निम्मी संख्या मुक्त विद्यापीठांमध्ये शिक्षणासाठी जावी अशी अपेक्षा आहे. आज देशात ५ मुक्त विद्यापीठे आहेत व त्यांच्या परस्पर सहकार्याने विविध अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. हे अभ्यासक्रम जीवनात आणि व्यवसायात उपयुक्त असावेत यावर भर दिला जात आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने महाराष्ट्रातील सर्वसाधारण व शेती विद्यापीठांच्या सहकार्याने पदवी स्तरावरील उपयोजित अभ्यासक्रम विकसित करण्याचा संकल्प केला आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा आणि संशोधनाचा समाजपरिवर्तनाशी आणि महाराष्ट्राच्या विकासाशी संबंध असावा या दृष्टीने वाटचाल सुरू केली आहे. हे अभ्यासक्रम जसे सर्वसामान्यांना घेता येतील, तसेच ते विद्यापीठांतील आणि महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनाही घेता येतील. यातूनच सर्वसाधारण विद्यापीठाचे काही पाठ्यक्रम आणि मुक्त विद्यापीठाचे काही पाठ्यक्रम अभ्यासून पदवी अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास सर्व विद्यार्थ्यांसाठी फार मोठी सुविधा उपलब्ध होणार आहे. विद्यापीठीय शिक्षण हे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे फार मोठे साधन झाले पाहिजे. तरच ते देशाच्या व राज्याच्या विकासाच्या कार्यात, नवीन शैक्षणिक धोरणात म्हटल्याप्रमाणे मध्यवर्ती मंचावर (Centre Stage) येऊ शकेल.

माझ्या तरूण मित्रांनो, आज आपण पदव्या मिळवल्यात व लवकरच आपण व्यावसायिक जीवनाच्या क्षेत्रात पदार्पण करणार आहात. दहा वर्षांनी एकविसाव्या शतकाची सुरूवात होणार आहे. त्या शतकातच आपल्या आयुष्याचा महत्त्वाचा कार्यकाल जावयाचा आहे. एकविसाव्या शतकातील समाजजीवनामध्ये प्रचंड बदल येणार आहेत. एका संज्ञापन शास्त्रज्ञाने म्हटले की, ते बदल काय असतील याची कल्पनाही करता येणे अशक्य. अशा वेगाने तंत्रज्ञानाचा विकास होत आहे. कथा–

कादंबऱ्यांत शोभावेत अशा अद्‌भूत बदलांना तुम्हाला सामोरे जावे लागणार आहे. बदलत्या परिस्थितीत काम करावे लागणार आहे.

मी आपणांस खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की, या बदलांमागील शक्ती असणार आहे ज्ञान. ज्ञान हेच भावी समाजाचे सर्वश्रेष्ठ भांडवल होणार आहे. आजच्या उद्योगधंद्याला पैशाचे भांडवल लागते. भावी उद्योगांना ज्ञानाचे भांडवल लागणारे आहे. ज्ञानाची किंमत कधी नव्हे तशी वाढणार आहे. परंतु, हे ज्ञान सर्वश्रेष्ठ असले पाहिजे, अति उच्च दर्जाचे पाहिजे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकाव धरून, स्पर्धा करून श्रेष्ठ ठरणारे ज्ञान असले पाहिजे. जीवनातील विविध प्रश्न सोडवण्यास समर्थ असलेले ते ज्ञान असले पाहिजे. असे ज्ञान मिळवण्यास अथक परिश्रमांची, सतत अभ्यासाची गरज आहे. एकविसाव्या शतकाचा समाज हा अध्ययनशील समाज असणार आहे. त्याचे नेतृत्व तुम्हांस करावयाचे आहे. योग्य ती प्रेरणा व अध्ययनपद्धती आपण वापरली तर कोणासही, कोणत्याही वयात जगातील कोणत्याही ज्ञान–कौशल्यांवर श्रेष्ठ प्रभुत्व मिळवता येते, असे आजचे शिक्षणशास्त्र सांगते. हजार–दीडहजार वर्षापूर्वी आपल्या पूर्वजांनी जगातील सर्वश्रेष्ठ संस्कृती व समाजव्यवस्था निर्माण केली होती. ज्ञान आणि विज्ञानात आश्चर्यकारक भर घातली होती. आज तुम्हा–आम्हांस ते पुन्हा करून दाखवावयाचे आहे. महाराष्ट्र आणि भारत देश प्रगतीच्या आणि विकासाच्या स्पर्धेत आघाडीवर नेण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी करावयाची आहे. स्वतःच्या आणि समाजाच्या उत्कर्षाच्या कार्यात आपण अग्रभागी राहाल, यशस्वी व्हाल आणि आपल्या यशाने या विद्यापीठाच्या लौकिकात भर घालाल, अशी मी सदिच्छा व्यक्त करतो.

आज आपण पवीधर झालात. या प्रसंगी मी आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो व थोर तत्ववेत्ता रस्किन यांचे पुढील विचार आपणास सतत मार्गदर्शक राहोत ही इच्छा करतो. “The entire object of true education is to make people not merely do the light things, but enjoy the right things, not merely industirous, but to love industry; not merely pure but to love purity; not merely just, but to hunger and thirst after ustice.”

धन्यवाद !

❑❑❑